एकजूट आमची न्यारी... देशभक्ती आम्हास प्यारी..!!

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०० ■ मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

प्रजासत्ताक दिन निमित्त सर्व देशवासीयांना हार्दिक शुभेच्छा

# कोण होणार महापौर ?

## शहर सुधार आघाडी विरूद्ध महाविकास आघाडी रंगणार मुकाबला

## अमरावतीत शहर सुधार आघाडीच्या 44 नगरसेवकांची ओळख परेड







प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** २०१७ च्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपा ३८ जागा जिंकून महापालिकेत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला असला तरी स्पष्ट जनादेश नसलेला भाजप आपल्या मित्र पक्षांची युती करून महापालिकेत सत्ता स्थापन करण्याची तयारी करत आहे महापौर पदासाठी भाजपने शारदा रंजीत खेडकर तसेच उपमहापौर पदासाठी अमोल गोगे यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर तसेच भाजपाचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी व नवनियुक्त नगरसेवकांनी महापालिकेत जाऊन महापौर व उपमहापौर पदाचे नामांकन दाखल केले. भाजपाने राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तीन नगरसेवक राष्ट्रवादी अजित पवार गटाचा एक नगरसेवक आणि शिवसेना शिंदे गटाची एक नगरसेविका तसेच महानगर विकास आघाडी गटाचा एक नगरसेवक अशा ४४ नगरसेवकांचा गट बनवीत भाजपाने सत्ता स्थापन करण्याचा दावा केला आहे यंदा भाजपाने महापौर तसेच उपमहापौर पदासाठी नवीन चेहऱ्यांना संधी देत जुन्या चेहऱ्यांना बाजूला सारल्याचे दिसून आले.

कोणत्याही परिस्थितीत भाजपाचा महापौर होईल आणि महापालिकेत स्थिर सरकार स्थापन होईल अशी प्रतिक्रिया जिल्ह्याचे पालकमंत्री एडवोकेट आकाश फुंडकर यांनी व्यक्त केली

महापौर आणि उपमहापौर पदाचे अर्ज भरल्यानंतर भाजपाचे सर्व पदाधिकारी व नगरसेवक महापालिकेतून निघून गेले त्यानंतर महाविकास आघाडीचे घटक पक्ष महापालिकेत पोहोचले महाविकास आघाडी तर्फे शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या सुरेखा मंगेश काळे यांनी महापौर पदाचा अर्ज भरला तर काँग्रेस तर्फे महापौर पदासाठी आझाद खान अली खान यांनी अर्ज दाखल केला महापौर पदाच्या निवडणुकीत नक्कीच चमत्कार दिसून येईल आणि महापौर व उपमहापौर आमचे निवडून येतील अशी प्रतिक्रिया महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिली.

परंतु महापौर आणि उपमहापौर पदाचा ट्विस्ट येथेच संपला नाही थोड्यावेळाने पूर्वाश्रमीचे भाजपाचे नगरसेवक आणि यंदा भाजपाने उमेदवारी नाकारलेले तसेच भाजपाच्या नाकावर टीचुन अपक्ष म्हणून निवडून आलेले आशिष पवित्रकार यांनी उपमहापौर पदाचा अर्ज दाखल केला आशिष पवित्रकार यांनी सुद्धा भाजपाची मते फुटतील आणि मी नक्कीच निवडून येईल असा विश्वास व्यक्त केला.

आज भारतीय जनता पार्टी द्वारा स्थापित शहर सुधार आघाडी च्या ४४ नगरसेवकांची ओळख परेड अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडली याप्रसंगी माहिती देताना भाजपाचे पूर्व महापौर तसेच नगरसेवक विजय अग्रवाल यांनी सांगितले की आमची शहर सुधार आघाडी मजबूत स्थितीत असून आमचाच महापौर उपमहापौर बसेल केंद्रात आणि राज्यात भाजपाचे सरकार असल्याने अकोला शहराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# मुंबईच्या महापौरपदाचा पेच वाढला!

## भाजपला धक्का : एकनाथ शिंदेंनी घेतला टोकाचा निर्णय

प्रतिनिधी २७ जानेवारी

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या महापौर निवडीसाठी आता अवघे दोन दिवस उरले आहेत. त्यातच आता महायुतीमधील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महापौरपद आणि स्थायी समितीच्या अध्यक्षपदावरून भाजप आणि शिवसेना एकनाथ शिंदे यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपचा एकत्रित गटनोंदणीचा प्रस्ताव फेटाळला आहे. त्यांनी आपल्या २९ नगरसेवकांची स्वतंत्र गटनोंदणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

भाजपला मुंबईत आपला महापौर बसवायचा आहे, कारण त्यांच्याकडे नगरसेवकांचे संख्याबळ जास्त आहे. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने अडीच वर्षे आमचा महापौर असावा अशी मागणी केली आहे. या मुद्द्यावरून दोन्ही पक्षांत एकमत होऊ शकलेले नाही. त्यातच आज दुपारी १२ वाजता शिवसेनेचे सर्व २९ नगरसेवक दादर येथील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करतील. त्यानंतर हे सर्व नगरसेवक बसने नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील कोकण भवन येथे जाऊन स्वतंत्र गटाची अधिकृत नोंदणी करतील. सध्या एकनाथ शिंदे साताऱ्यातील दरे गावी आहेत. त्यामुळे राहुल शेवाळे आणि शीतल म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया पार पडणार आहे.

दरम्या महापौरपदासाठी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २८ जानेवारी आहे. येत्या ३१ जानेवारीला ही निवडणूक होणार आहे. त्यातच शिवसेना शिंदे गट स्वतंत्र नोंदणी करत असल्याने भाजपवर दबाव वाढला आहे. जर दोन्ही पक्षांत तडजोड झाली नाही, तर मुंबईच्या महापौरपदाची निवडणूक अतिशय नाट्यमय होऊ शकते. ३१ जानेवारीला महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक पार पडणार आहे.



### भाजपला महापौर बसवणे कठीण

मुंबईत सत्ता स्थापनेसाठी ११४ हा बहुमताचा आकडा आहे. भाजपकडे ८९ तर शिंदे गटाकडे २९ नगरसेवक आहेत. शिंदे गटाच्या पाठिंब्याशिवाय भाजपला महापौर बसवणे कठीण आहे. त्यामुळे आगामी दोन दिवसांत देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात बैठक होणार का आणि त्यात महापौर पदाबद्दल सकारात्मक तोडगा निघणार का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### अडीच वर्षांसाठी महापौरपदावर ठाम

काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी आपल्या नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवले होते. यामुळे भाजपचे दिल्लीतील वरिष्ठ नेते नाराज झाले आहेत. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना महापौरपदाबाबत कोणतीही तडजोड करू नका असे स्पष्ट आदेश दिले आहेत. दुसरीकडे, शिंदे गट पहिल्या अडीच वर्षांसाठी महापौरपदावर ठाम असल्याने पेच निर्माण झाला आहे. मुंबईत तणाव असतानाच एकनाथ शिंदे साताऱ्यातील आपल्या दरे गावी निघून गेले आहेत. भाजपच्या भूमिकेवर त्यांनी ही एक प्रकारची नाराजी व्यक्त केली आहे, असे म्हटले जात आहे.

# अमरावतीत किन्नरांच्या दोन गटात हाणामारी

## एका गटाने केला सशस्त्र हल्ला; तीन किन्नर गंभीर जखमी



प्रतिनिधी २७ जानेवारी

**अमरावती :** येथील आशियाड कॉलनी शेगाव नाका परिसरात दोन किन्नरांच्या गटात आज सकाळच्या सुमारास हाणामारी झाली. यातील एक गटाने दुसऱ्या गटावर सशस्त्र हल्ला केला. यामध्ये एका किन्नराच्या पोटावर तलवारीने वार करण्यात आले आहे. या हाणामारीत तीन जण जखमी झाले असून, त्यांच्या इर्विन रूग्णालयात उपचार सुरू असल्याचे समजते. या प्रकरणी किन्नरांनी तक्रार दाखल करण्यासाठी गाडगेनगर पोलिस ठाण्यात धाव घेतली असून, वृत्त लिहिपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. आम्रपाली गट पोलिस स्टेशनला जमा झाला असून, आरोपी किन्नर फरार झाले असून, त्यांचा पोलिस शोध घेत आहेत. ही हाणामारी जुन्या वादातून झाल्याचे समजत आहे.

# बाबासाहेबांचे नाव न घेणे महाजनांना भोवणार?

## प्रकाश आंबेडकरांनी दिला गंभीर इशारा



प्रतिनिधी २७ जानेवारी

**नाशिक:** प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव भाषणात न घेतल्याने नाशिकमध्ये मोठा वाद निर्माण झाला आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी तीव्र शब्दांत निशाणा साधला असून, त्यांच्यावर 'अ‍ॅट्रोसिटी' अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

नाशिकमध्ये ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात पालकमंत्री गिरीश महाजन यांनी उपस्थितांना संबोधित केले. प्रजासत्ताक दिन हा संविधानाच्या अंमलबजावणीचा दिवस असतानाही, महाजन यांनी आपल्या संपूर्ण भाषणात एकदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख केला नाही. पालकमंत्र्यांनी हे नाव जाणीवपूर्वक टाळले की ते विसरले, याबाबत संभ्रम असला तरी या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत.

### प्रकाश आंबेडकरांचा इशारा

या घटनेनंतर प्रकाश आंबेडकर यांनी माधवी जाधव यांच्याशी फोनवरून संवाद साधला आणि त्यांचे समर्थन केले. आंबेडकर म्हणाले की, ठमंत्री गिरीश महाजन यांचे कृत्य ही नीच मानसिकता दर्शवणारे असून तो अ?ट्रोसिटी कायद्यांतर्गत गुन्हा आहे. वंचित बहुजन आघाडीची स्थानिक समिती पोलिसांत तक्रार करत आहे. जर पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही, तर मी स्वतः कायदेशीर मसुदा तयार करून त्यांना कारवाई करण्यास भाग पाडेन.

### महिला वनरक्षकाचा संताप

कार्यक्रमात उपस्थित असलेल्या माधवी जाधव नावाच्या महिला वनरक्षकाने या प्रकाराबद्दल भर सभेत संताप व्यक्त केला. संविधानामुळेच आज सर्व पदे आणि अधिकार आहेत, मग संविधानाच्या जनकाचे नाव घेण्यास विसर का पडला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ठमला निलंबित केले तरी चालेल, पण बाबासाहेबांची ओळख पुसू देणार नाही, अशा शब्दांत त्यांनी पालकमंत्र्यांना जाब विचारला.

# मुख्यमंत्री फडणवीसांच्या ७ दिवसात २२ सभा!

## जिल्हा परिषद निवडणुकीसाठी करणार झंझावाती दौरे

प्रतिनिधी २७ जानेवारी

**मुंबई :** २९ महापालिका निवडणुकीत सरस कामगिरी केल्यानंतर भाजपाने आता मिशन जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केले आहे. १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक होत असून, स्थानिक पातळीवर भाजपा नेत्यांबरोबरच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही प्रचारात उतरणार आहेत. प्रचारासाठी मोजकेच दिवस मिळणार असून, मुख्यमंत्री फडणवीस तब्बल २२ सभा घेणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारात दिसणार आहेत. १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकीसाठी पुढील सात दिवसांमध्ये मुख्यमंत्री फडणवीसांच्या २२ सभा होणार आहेत. २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या काळात मुख्यमंत्री फडणवीस झंझावाती प्रचार दौरा करणार आहेत. २८ जानेवारी रोजी रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या तीन जिल्ह्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सभा होणार आहेत. त्यानंतर ३ फेब्रुवारीपर्यंत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या इतर जिल्हा परिषद निवडणुकीसाठीही सभा होणार आहेत. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांसाठी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात म्हणजे ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर ७ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदांसाठीच निवडणूक होत आहे. ३२ जिल्हा परिषदांसह ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर पडलेल्या आहेत. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्या गेल्यामुळे या निवडणुका अद्याप जाहीर होऊ शकलेल्या नाहीत.

# ५ दिवसीय बँकिंगसाठी बँक कर्मचाऱ्यांचा संप

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला :** केंद्र सरकार व आयबीए यांच्या दिरंगाईच्या धोरणाविरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत युनायटेड फोरम ऑफ बैंक यूनियन्स, अकोला यांच्या नेतृत्वाखाली ५ दिवस बँकिंग लागू करा या मागणीसाठी अकोला शहरात आज बाईक रॅली काढण्यात आली. ही रॅली बँक ऑफ महाराष्ट्र, झोनल ऑफिस, जठारपेठ येथून सुरू होऊन रामदासपेठ मार्गे कोर्ट, अग्रसेन चौक ते उड्डाणपूल ते बँक ऑफ इंडिया, गोरक्षण रोड शाखा येथे जाहीर सभेसह समाप्त झाली.





या रॅलीत शहर व जिल्ह्यातील विविध राष्ट्रीयीकृत व ग्रामीण बँकांमधील २०० पेक्षा अधिक बँक कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ठ५ दिवस बँकिंग आमचा हक्क आहेठ, ठआता संयम संपला आहेठ, ठमागण्या मान्य करा अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करुठ अशा आक्रमक घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले. या रॅलीच्या समापन प्रसंगी झालेल्या सभेत कॉ. प्रविण महाजन, कॉ. कुलदीप महाल्ले, कॉ. आशीष गोसावी, कॉ. हर्षल बोर्डे, कॉ. अभिजीत ताले, आशिष मावळे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, ५ दिवस बँकिंगची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित असून सरकार व आयबीए जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. ही मागणी तात्काळ मान्य न झाल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र, व्यापक आणि निर्णायक स्वरूपाचे केले जाईल.वक्त्यांनी सांगितले की, बँक कर्मचारी वाढत्या कामाचा ताण, अपुऱ्या मनुष्यबळात काम करत असूनही देशाची आर्थिक व्यवस्था सांभाळत आहेत. अशा परिस्थितीत ५ दिवस बँकिंग हा कोणताही सवलतीचा विषय नसून बँक कर्मचाऱ्यांचा मूलभूत हक्क आहे. आधीच तीन दिवस बँक बंद असल्याने नागरिकांचे आर्थिक व्यवहार बंद होते आता परत चौथ्या दिवशी बँका बंद असल्याने नागरिकांची डोकेदुखी मात्र वाढली आहे.

# अमृता फडणवीसांबद्दल प्रख्यात गायिकेचे वादग्रस्त वक्तव्य, ठाकरेंच्या रणरागिणीही भडकल्या!

प्रतिनिधी २७ जानेवारी

**मुंबई :** गायिका अंजली भारती यांनी भंडाऱ्यातील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर भाजप आणि शिंदे सेनेचे नेते आक्रमक झाले होते. अशातच आता उद्धव ठाकरे यांची शिवसेनाही अमृता फडणवीस यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली आहे. ठाकरे गटाच्या किशोरी पेडणेकर, अंबादास दानवे, संजय राऊत या सर्व नेत्यांनी अमृता फडणवीस यांच्याविषयीचे वक्तव्य अयोग्य असल्याचे सांगत या प्रकाराच निषेध केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याबद्दल गायिका अंजली भारती यांनी जे वक्तव्य केले आहे, त्याचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या महिला आघाडीकून निषेध करत असल्याचे ट्विट ठाकरे गटाच्या मुंबई महानगरपालिकेतील गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी केले. संजय राऊत आणि अंबादास दानवे यांनीही अमृता फडणवीस यांच्याविषयीचे वक्तव्य योग्य नसल्याचे म्हटले.



सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# दिव्यांग लाभार्थ्यांना हयातीचे प्रमाणपत्र काढण्याचे आवाहन

**अमरावती :** दिव्यांग लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. हे वाढीव अनुदान प्राप्त झाले नसल्यास ह्यातीचे प्रमाणपत्र काढून पोर्टलवर अपडेट करावे लागणार आहे. त्यासाठी दिव्यांग लाभार्थ्यांनी ह्यातीचे प्रमाणपत्र काढावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दिव्यांग लाभार्थ्यांच्या अनुदानात १ हजार रूपयांची वाढ करून २ हजार ५०० रूपये इतके अनुदान डीबीटीद्वारे देण्यात येत आहे. यासाठी लाभार्थ्यांचे ऑनलाईन यूडीआयडी कार्ड दिव्यांग प्रमाणपत्र पोर्टलवर अपडेट करणे आवश्यक आहे. दिव्यांग लाभार्थ्यांना अद्यापही वाढीव अनुदान प्राप्त झाले नाही, त्यांनी आपले यूडीआयडी कार्ड, आधार कार्ड आणि आधार लिंक असलेल्या बँक पासबुकची प्रत तहसिल कार्यालयातील संजय गांधी योजना शाखेत सादर करावी. शासनाकडून केंद्र, पुरस्कृत इंदिरा गांधी, राष्ट्रीय वृद्धापकाळ, वीर पत्नी व दिव्यांग योजनांच्या लाभार्थ्यांना दरवर्षी ह्यातीचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. योजनेतील लाभार्थ्यांना ह्यातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाकडून आधार आधारीत जीवन प्रमाणपत्र प्रणाली विकसित केली आहे.

# राष्ट्र प्रथम अभियाना अंतर्गत २१ हजार शाळेमध्ये दिले जाणार स्वसंरक्षणाचे धडे- शिक्षणमंत्री दादा भुसे

◆ कवायतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती रूजविण्यास मदत झाली ◆ विद्यार्थ्यांकडून सुंदर कवायतीचे सादरीकरण

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अमरावती :** ७७. व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अमरावती येथील शासकीय ध्वजारोहण राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे साहेब याच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना शिक्षणमंत्री यांनी उपस्थित सर्व स्वातंत्र्य सेनानी, लोकप्रतिनिधी, शेतकरी, अधिकारी, पत्रकार, विद्यार्थी व सर्व उपस्थिताना ना. दादाजी भुसे शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी अमरावती शहरातील नामवंत विविध शाळेतील तब्बल २००० हजार विद्यार्थ्यांनी सामुहीक कवायतीचे आयोजन या प्रसंगी करुन शिक्षणमंत्री दादाजी भुसे व सर्व उपस्थितीत मान्यवरांनी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षण विभागाचे कौतुक केले. त्यानंतर शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी आपल्या भाषणामधे शिक्षण विभागाने कॉपीमुक्त अभियान राबविले आहे, आजच्या प्रजासत्ताक दिनी प्रत्येक शाळेत कॉपीमुक्तीबाबत शपथ घेण्यात येणार आहे.या माध्यमातून कार्याच्या परिणामांबावत जनजागृती होण्यास मदत मिळणार आहे.



मागील १५ ऑगस्ट रोजी आपण देशभक्तीपर गीतांवर सामुहिक कचायत संचलन करण्यात आले. यावेळीही २६ जानेवारीला राज्यभरातील सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राविण्यात आला, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती रूजविण्यास मदत झाली आहे. यात शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानतो.

महाराष्ट्र शासनाने गेल्या काही वर्षात शालेय शिक्षण क्षेत्रात राबविलेले धोरामात्मक निर्णय व उपक्रम हे पूर्णतः विद्यार्थी केंद्रित आहेत. राज्यातील सर्व शाळेत राष्ट्रगीतानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत सन्मानाने गायन करणे, शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाद्वारे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, माननीय लोकप्रतिनिधी तसेच अधिकारी यांच्या शाळाभेटी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी , शासकीय शाळातील विविध १५ समित्यांचे ४ समित्यात एकत्रीकरण, माजी विद्यार्थी संघ स्थापना, आयडॉल शिक्षक, शाळा,संस्था बैंक निर्मिती, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, आनंददायी शनिवार, क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले बालसंगोपन योजनेतर्गत एकल पालक योजना व राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेच्या राज्यात प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व अधिका-यांना स्वतः पुढाकार घेवून संबंधितांना लाभ मिळवून देण्यासाठी विभागामार्फत सु-मोटो आदेश, राष्ट्र प्रथम' अभियानांतर्गत राज्यातोल २१ हजारांहून अधिक शाळांमधील मुलीना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. यामध्ये राज्यातील विद्यार्थाना १० हजार माजी सैनिक, एनसीसी आणि स्काऊट गाईड कैडेट्सच्या माध्यमातून लष्करी शिस्त, संचलन आणि देशरक्षणाचे धडे देण्यात येणार आहे.तसेच १० हजार प्रबोधनकारांमार्फत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय विचार आणि व्यक्तिमत्व विकासासाठी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यातील सर्व शाळांमध्ये वर्षभर विविध शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

विकास हा केवळ रस्ते आणि इमारती अशा पायाभूत सुविधांचा नव्हे, तर तो प्रत्येक सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात बदल घडवणारा असावा, हीच आमची भूमिका आहे. त्यादृष्टीने राज्याने नियोजन केले असून राज्याची सशक्त वाटचाल सुरू आहे.असेही आपल्या भाषणातून शिक्षणमंत्री दादाजी भुसे साहेब यांनी सांगितले.यावेळी अँड.श्री. निलेश हेलोंचे पाटील अध्यक्ष, राज्यमंत्री दर्जा) कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य रवींद्र हनुमंतराव ठाकरे,राज्य माहिती आयुक्त, अमरावती खंडपीठ,डॉ.श्री. रामबाबु नरुकुल्ला आयुक्त (मुख्य सचिव दर्जा महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग, अमरावती विभाग अमरावती,श्रीमती. श्वेता सिंगल, (भा.प्र.से.)विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती,श्री. रामनाथ पोकळे (भा.प्र.सेविशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परिक्षेत्र, अमरावती,श्री. आशिष येरेकर (भा.प्र.से) जिल्हाधिकारी अमरावती,श्री. राकेश ओला (भा.पो.से)पोलीस आयुक्त, अमरावती शहर,श्रीमती सोम्या चांडक (पा.प्र.से),आयुक्त, महानगरपालिका अमरावती,श्रीमती. संगीता मोह पात्रा (भा.प्र.से ) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती,श्री. विशाल आनंद (भा.पो.से )पोलोस अधिक्षक, अमरावती ग्रामीण,श्रीमती कमलाताई रामकृष्ण गवई,श्री. जनार्दनपंत बोथे गुरुजी पद्?मश्री पुरस्कार सन्मानित,श्री संदीप संगवे विभागीय अध्यक्ष शिक्षण मंडळ अमरावती,तसेच अमरावतीतील मोठ्या संख्येने नागरिक व विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.अशी माहिती रविंद्र रामकृष्ण सोळंके यांनी दिली.

# भारतीय प्रजासत्ताकाचा वर्धापन दिनोत्सव

## विभागीय आयुक्तालयात ध्वजारोहण व तिरंग्यास मानवंदना



प्रतिनिधी २७ जानेवारी

**अमरावती :** भारतीय प्रजासत्ताकाच्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त विभागीय आयुक्तालयात आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन तिरंग्यास मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी विभागीय आयुक्तांनी उपस्थित सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व राज्यगीतानंतर पोलीस पथकाव्दारे तिरंग्यास मानवंदना देण्यात आली. यावेळी अपर आयुक्त सुरज वाघमारे, संजय जाधव, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सुशील आग्रेकर, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे, नायब तहसीलदार मधुकर धुळे, संदीप टांक, श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

# राजस्थानमध्ये सरपंच प्रशासक; महाराष्ट्रात अधिकाऱ्यांची नेमणूक का?

प्रतिनिधी २७ जानेवारी

◆ सरपंच संघटनांचा सवाल

**अमरावती:** राजस्थान राज्यात ग्रामपंचायतींच्या कारभारासाठी सरपंचांनाच प्रशासक म्हणून जबाबदारी देण्यात येत असताना, महाराष्ट्रात मात्र प्रशासक म्हणून शासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली जात असल्याने संभ्रम आणि नाराजी निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध सरपंच संघटनांनी शासनाच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप नोंदवत, 'महाराष्ट्रात वेगळा निकष का?' असा सवाल उपस्थित केला आहे.



सरपंच संघटनांच्या मते, ग्रामपंचायतींच्या कामकाजाची सखोल माहिती सरपंचांकडेच असते. त्यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी, लोकाभिमुख आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सरपंचांनाच प्रशासकपद देणे योग्य ठरेल. राजस्थानप्रमाणेच महाराष्ट्रातही हीच पद्धत राबविण्याची मागणी संघटनांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नेमणूक केल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वायत्ततेवर मर्यादा येत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यासंदर्भात शासनाने तातडीने स्पष्ट भूमिका घ्यावी, अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही सरपंच संघटनांनी दिला आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्य माहिती आयोगात ध्वजारोहण

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अमरावती :** भारतीय प्रजासत्ताकाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती कार्यालयात राज्य माहिती आयुक्त रविंद्र ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी आयोगातील उप सचिव देविसिंग डाबेराव, कार्य अधिकारी महेंद्र गायकवाड यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रध्वज वंदन, राष्ट्रगीत व पोलीस कर्मचाऱ्यांकडून तिरंग्यास मानवंदना याप्रमाणे कार्यक्रम संपन्न झाला.



# संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेमुळे 'ऑपरेशन सिंदूर'ला यश

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अमरावती :** देशाने संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे टाकलेली भक्कम पावलेच 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाचे प्रमुख कारण ठरली आहेत, असे प्रतिपादन डीआरडीओचे निवृत्त संचालक काशीनाथ देवधर यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.



यावेळी देवधर यांनी भारताच्या संरक्षण संशोधनातील वाटचाल, स्वदेशी तंत्रज्ञानाचा वाढता वापर, तसेच संरक्षण सज्जतेसाठी डीआरडीओने केलेल्या योगदानावर सविस्तर प्रकाश टाकला. परकीय तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता स्वदेशी संशोधन, उत्पादन आणि नवोन्मेष यामुळेच भारत आज सामरिकदृष्ट्या अधिक सक्षम झाला असल्याचे त्यांनी नमूद केले.

'ऑपरेशन सिंदूर'सारख्या मोहिमांच्या यशामागे देशांतर्गत विकसित शस्त्र प्रणाली, आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यांचा मोठा वाटा असल्याचे सांगत, संरक्षण आत्मनिर्भरतेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विज्ञान, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअर घडवावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या व्याख्यानास विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी संरक्षण क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवर चर्चा केली.

# पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये आनंद मेळ्याचे उत्साहात

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये नुकताच आनंद मेळ्याचे भव्य व उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या आनंद मेळ्याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आनंद, सर्जनशीलता, संघभावना व उद्योजकीय कौशल्यांचा विकास करणे हा होता.

आनंद मेळ्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, खेळ, हस्तकला वस्तू, तसेच मनोरंजनात्मक उपक्रम सादर केले. रंगीबेरंगी सजावट व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण शाळा परिसर आनंदमय वातावरणाने भरून गेला होता. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, मेहनतीचे व आत्मविश्वासाचे कौतुक केले. अशा



उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. पालक व शिक्षकांनीही या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.या कार्यक्रमाला उपस्थित संस्थेचे अध्यक्ष , शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्री प्रायमरी इन्चार्ज यांची उपस्थिती लाभली. हा आनंद मेळा विद्यार्थ्यांसाठी एक आनंददायी व अविस्मरणीय अनुभव ठरला.

# उद्या पासून थंडीचे प्रमाण वाढण्याची शक्यता!

**अमरावती :** उद्या अमरावती अकोला जिल्ह्यात तुरळक ठिकाणी गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता. पश्चिमी विक्षोभ आणि चक्रवात तसेच पंजाब हरियाणा आणि अरबी समुद्रातील द्रोणिय स्थिती च्या प्रभावामुळे उद्या विदर्भात अंशतः ढगाळ वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच काही तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. तसेच उत्तरेकडून येणाऱ्या थंड वार्यामुळे विदर्भात थंडीचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. असे मत हवामान तज्ञ प्रा अनिल बंड श्री शिवाजी हवामान केंद्र अमरावती यांनी व्यक्त केले आहे.

# महापौरपदाच्या रणनितीसाठी वर्षा बंगल्यावर आज महत्त्वपूर्ण बैठक

प्रतिनिधी २७ जानेवारी

◆ मुख्यमंत्री फडणवीस, पालकमंत्री बावनकुळे व आमदार रवी राणा यांच्यात चर्चा

**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेतील आगामी महापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मंगळवार, २७ जानेवारी रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यावर एक अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला राज्याचे महसूल मंत्री तसेच अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर दुपारी २ वाजता ही बैठक होणार आहे.

महानगरपालिकेतील सत्तास्थापनेसाठी आणि महापौरपदासाठीची संपूर्ण राजकीय रणनिती या बैठकीत ठरणार असल्याने या बैठकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. अलीकडेच पार पडलेल्या अमरावती महानगरपालिका निवडणुकीत भाजपने सर्वाधिक २५ जागांवर विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. तर आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचे १५ उमेदवार निवडून आले आहेत.

महानगरपालिकेत स्पष्ट बहुमतासाठी आवश्यक संख्याबळ कोणाकडेही नसल्याने, भाजप आणि युवा स्वाभिमान पक्ष यांच्यातील युती आणि सत्तास्थापनेबाबत अंतिम निर्णय या बैठकीत घेतला जाण्याची शक्यता आहे. महापौरपदाचा उमेदवार कोण असावा, पदांची विभागणी, तसेच पुढील राजकीय समन्वय याबाबत सविस्तर चर्चा होणार असल्याचे संकेत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# खामगावला उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांच्या हस्ते ध्वजारोहण

◆ डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदानावर मुख्य समारंभ

प्रतिनिधी २७ जानेवारी

**खामगाव:** येथे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय कार्यक्रम सोमवारी सकाळी ९.१५ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदानात झाला. उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

नगराध्यक्ष अपर्णाताई फुंडकर, माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, नानाभाऊ कोकरे, मुख्याधिकारी शेळके यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी, शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




नगरपालिका इमारत तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानाचे सुशोभिकरण करण्यात आले होते. शहरातील विविध शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साहाने साजरा केला.

# वाडी येथे दरोडेखोरांनी हल्ला करून बाप व मुलाला केले जखमी

प्रतिनिधी २७ जानेवारी

**खामगाव :** खामगाव शहरालगत असलेल्या वाडी परिसरात चार सशस्त्र दरोडेखोरांनी एका घरावर दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. यावेळी घरमालक आणि त्यांच्या मुलाने दरोडेखोरां चा प्रतिकार केला.प्रतिकारामुळे संतप्त झालेल्या चोरांनी या बाप- मुलावर चाकूने वार करत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात मनोज अग्रवाल आणि मयंक अग्रवाल हे दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारच्या मध्यरात्री घडलेल्या एका थरारक घटनेने तर संपूर्ण जिल्हा



हादरून गेला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खामगाव शहरात पासुन जवळ असलेल्या वाडी परिसरात सोमवारच्या मध्यरात्रीच्या सुमारास चार अज्ञात सशस्त्र दरोडेखोरांनी या परिसरात राहणारे मनोज अग्रवाल यांच्या घरात प्रवेश केला. या चोरट्यांचा हालचाली अग्रवाल कुटुंबीयांच्या लक्षात आल्या. त्यामुळे मनोज अग्रवाल, त्यांचा मुलगा मयंक अग्रवाल यांनी दरोडेखोरांना रोखण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत हिंसक झालेल्या दरोडेखोरांनी धारदार शस्त्रांनी बाप- मुलावर जोरदार हल्ला चढवला. मनोज आणि मयंक यांच्यावर चाकूचे एकामागून एक तब्बल वार केले. या हल्ल्यात मनोज आणि मयंक गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडले. आरडाओरड ऐकून परिसरातील नागरिक जागे झाले. मात्र, तोपर्यंत दरोडेखोर घटनास्थळावरून पसार झाले. जखमी अवस्थेत दोघांनाही तातडीने खामगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच खामगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. त्यामध्ये चारही संशयित दरोडेखोर कैद झाले असून या फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

**तहसिलदार मंगरूळपिर कार्यालय**

**रा.मा. क्र. टिएनसी-४६/कोठारी/ /२०२५-२६**

**जाहिरनामा**

या जाहीरनाम्याद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी संदर्भिय अर्जान्वये अर्जदार श्री.. शोभा ओमप्रकाश करोडदेय रा. कुंभारकिन्ही ता. दारव्हा, जि. यवतमाळ यांचा अर्जान्वये सुरु करण्यात आले आहे. प्रकरणात अर्जदार यांची मौजे कोठारी येथील सर्वे क्र./ गट क्र. २२४ मधील एकूण क्षेत्र २.७४ हे. आर. शेत जमीन असून सदर शेत जमीन अर्जदार यांचे ताब्यात व वहीतीत आहे. सदर जमीनीचे ७/१२ वर इतर अधिकार मध्ये भगवान बापुसा हा सन १९५७- ५८ प्रमाणे स प झाला दर्शविलेले आहे. सदर कुळाचा बोझा कमी करण्यासाठी अर्जदार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे. अवगन सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप/ हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून(कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून) १५ दिवसाचे आत लेखी स्वरूपात या कार्यालयात आपल्या हरकती/ आक्षेप सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्थळ: मंगरूळपीर**

**दिनांक: ०९/०१/२०२६** **तहसिलदार मंगरूळपीर**

# सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


## चोहोट्टा बाजार येथे जुगारावर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी २७ जानेवारी

**कुटासा:** अकोट तालुक्यातील चोहोट्टा बाजार परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांनी मोठी कारवाई करत 'एक्का बादशाहा' चार्टवर सुरू असलेला जुगार उध्वस्त केला आहे. या कारवाईत सहा जणांना ताब्यात घेण्यात आले असून तब्बल ३६ हजार ६६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई शुक्रवार, २४ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली. मिळालेल्या पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी धाड टाकली. छाप्यात हर्षल रघुनाथ खेडकर (रा. चोहोट्टा बाजार) हा जुगार चालवत असल्याचे आढळून आले. त्याच्यासह जुगार खेळणारे ज्ञानेश्वर पिंपरे (कुटासा), बाळकृष्ण कोलटक्के (रेल), गोवर्धन वानखडे (कावसा), केशव नरवाडे (चोहोट्टा बाजार) आणि बाळकृष्ण मातुरकर (टाकळी) यांना ताब्यात घेण्यात आले. काही जण घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाले.

## रेणुका धात्रक यांची विदर्भस्तरीय कॅरम स्पर्धेत विजयाची हॅटट्रिक



प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** स्थानिक ब्रिलियंट कॅरम अकादमीच्या स्टार खेळाडू रेणुका धात्रक, शाखा अभियंता यांनी आपल्या उत्कृष्ट कॅरम खेळाचे प्रदर्शन करून नागपूर उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत नागपूर प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळच्या वतीने चंद्रपूर येथे झालेल्या विदर्भस्तरीय कॅरम स्पर्धेत रेणुका धात्रक यांनी प्रथम क्रमांक मिळविला. धात्रक यांनी मागील तीन वर्षांपासून सातत्याने प्रथम क्रमांक मिळवत हॅटट्रिक साधली आहे. त्या ब्रिलियंट कॅरम अकादमीत कॅरम प्रशिक्षक जितेंद्र अग्रवाल यांच्याकडून प्रशिक्षण घेत असतात. या कामगिरीनिमित्त प्रो कोड अकादमीच्या फाउंडर वर्षा पटेल यांनी त्यांचा सत्कार करीत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्यात. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक जितेंद्र अग्रवाल, प्रो कोड अकॅडमीच्या फाउंडर वर्षा पटेल, विदर्भ कॅरम असो.चे सचिव प्रभजीत सिंह बछेर, संदीप पुंडकर, त्यांचे पती मनोज खांडरे व मुलगी राष्ट्रीय कॅरम खेळाडू शर्वरी खांडरे यांना दिले आहे.

## वीरशैव लिंगायत महिला मंडळाचा हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न



**अकोला:** लिंगायत समाजातील महिलांच्या सामजिक व सांस्कृतिक सेवेत सक्रिय असणाऱ्या वीरशैव लिंगायत महिला मंडळाच्या वतीने महिलांचा हळदी कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. स्थानिक माळीपूरा परिसरातील जंगम मठ येथे आयोजित या कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात पतंगांची आकर्षक रचना, तिळापासून बनवलेली भांडी, बिस्कीटची ट्रेन, वानांच्या साहित्या पासून तयार केलेली रांगोळी, पैठणी वर नथीची रेखाटलेली सुंदर रांगोळी, सजावट, वान, सौ. सोसे ताईंचा सत्कार, नाविन्य पूर्ण खेळातील विजयी स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे, आरोग्यवर्धक पेय आणि विविध प्रकारचे खेळ हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

## प्रजासत्ताक दिन मुख्य शासकीय समारंभ

### ◆ ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ लालबहादूर शास्त्री क्रीडांगण येथे झाला. विविध क्षेत्रातील मान्यवर व अकोलेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री फुंडकर यांनी विशेष वाहनातून पथकांचे अवलोकन केले. सोबत परेड कमांडर आयपीएस अधिकारी ईशानी आनंद तर पोलीस कर्मचारी सुरेश म्हैसने यांनी वाहनाचे सारथ्य केले.

प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ लालबहादूर शास्त्री क्रीडांगण येथे झाला. विविध क्षेत्रातील मान्यवर व अकोलेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य शासकीय समारंभ प्रसंगी आमदार वसंत खंडेलवाल, अमोल मिटकरी, जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने, विभाग प्रमुख, स्वतंत्रता सेनानी आणि मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते पोलिस अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील व्यक्तींना गौरवण्यात आले. कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.



## अकोला महानगरपालिकेत आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या हस्ते ध्वजारोहण

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिना निमित्त २६ जानेवारी रोजी महापालिकेत मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी, नगर सेविका उषाताई विरक, शशिकला काळे, नीतू जगताप यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या निमित्त विविध ठिकाणी रोषणाई करण्यात आली होती. तसेच सुंदराबाई खंडेलवाल टॉवर येथे महापालिकेचे मुख्य लेखा परीक्षक वैजनाथ शेळके, हुतात्मा स्मारक येथे ज्येष्ठ स्वतंत्रता सेनानी विलास मुंजे, आदर्श कॉलनीत अमृत वाटिका मनपा शाळा क्रमांक १६ मध्ये अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अकोलेकरांना दर्जेदार व मुलभूत सेवा सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. स्वच्छ भारत मिशनची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल अशी ग्वाही मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी दिली. तसेच प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



## बार्शीटाकळी तहसीलमध्ये राष्ट्रगीताचा अवमान?

### ◆ पालकमंत्र्यांचे दोषींवर कारवाईचे आदेश



प्रतिनिधी २७ जानेवारी

**बार्शीटाकळी:** बार्शीटाकळी तहसील कार्यालयात ध्वजारोहण सोहळा दरम्यान राष्ट्रगीत अर्धवट वाजविण्यात आले. या गंभीर बाबीवर जाब विचारला असता रवींद्र कापशीकर यांनी पत्रकारांशी उद्धट वर्तन केले. या गंभीर प्रकाराबद्दल पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी दोषींवर कारवाईचे आदेश दिले.

२६ जानेवारी रोजी बार्शीटाकळी तहसील कार्यालयात शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रगीत सुरू करण्यात आले. मात्र ते पूर्ण न वाजवता अर्ध्यावरच थांबविण्यात आले. राष्ट्रगीत हे जनगणमन पासून सुरू होते पण तहसील कार्यालयामध्ये गुजरात हिंदू मराठा यापासून सुरू करण्यात आले. उपस्थित पत्रकारांनी गंभीर चुकीबाबत तहसीलदार यांना विचारणा केली. आपली चूक मान्य करण्या ऐवजी तहसीलदारांनी गणमान्य व्यक्तीसमोर पत्रकारांचा अपमान केला. बार्शीटाकळी येथील सर्व पत्रकारांनी पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. गांभीर्य लक्षात घेऊन पालकमंत्री यांनी घटनेत दोषी असणाऱ्यावर तातडीने कारवाई करू असे प्रशासनाला आदेश दिले. हे प्रकरण आता कोणावर शकते याकडे लक्ष आहे.

## गणतंत्र दिवस 'रक्तदानाने' केला गेला साजरा



प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** डाबकी रोडवरील आदर्श मित्र मंडळाने स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवून गणतंत्र दिवस साजरा केला. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश देत मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मातृशक्तीने मोठ्या उत्साहात रक्तदान केले. या रक्तदान या शिबिरात मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, या उपक्रमात मातृशक्तीचा सहभाग लक्षणीय ठरला. याप्रसंगी संदीप पवार, मनोज गायकवाड, आनंद जोशी, योगेश गोतमारे, जगदीश देशमुख आणि गोपाल वाघ यांच्यासह मान्यवरांनी उपस्थित राहून युवकांना प्रोत्साहित केले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राजूभाऊ होरे, गुड्डूभाऊ चोपडे, ओमप्रकाश वाडेकर, सुशील जैन, प्रकाश गायकवाड, हेमंत मलिये, वासुदेव जुनगडे, संतोष शेळके, विजय मेहरे, नवीन अकोटकार, महावीर शर्मा, जय काळे, मिलिंद जोशी, मदन चोपडे, महेश साबळे, गणेश गांडल, अजय रूईकर, वैभव सांगुनवेळे, गोटू माडीवाले, रोशन पवार, हर्षल निचळे, आदित्य कोडपे, रूपल पवार, सुमित पवार, पप्पु मुरकर, पप्पु तायडे, सुनिल केळकर, रवि दुतोंडे, प्रेम पट्टे, प्रमोद भाकरे आणि आशु काळे यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवला. केवळ पुरुषच नव्हे, तर महिलांनीही मोठ्या संख्येने पुढे येत रक्तदान केले. यामध्ये प्रामुख्याने सौ. शीतलताई गायकवाड, सौ. शीतल गोतमारे, सौ. पल्लवी जोशी, सौ. नीता जोशी, सौ. रोहीणीताई होरे, सौ. भारती माडीवाले, रश्मि मलिये, सौ. पल्लवी मोरे, यांच्यासह परिसरातील अनेक युवक-युवतींनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. आदर्श मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

## मॉ गायत्री प्राथमिक व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला द्वारे संचालित मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय, गायत्रीनगर येथे ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

प्रजासत्ताक दिनाच्या या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या उपाध्यक्षा तथा लायन्स क्लबच्या प्रांताध्यक्षा सौ. कल्पनाताई देशमुख आणि संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. सिद्धेश्वरराव देशमुख यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच व्यासपीठावर 'लिनेस' अकोलाच्या अध्यक्षा सौ. राजश्री समनपुरे, कोषाध्यक्षा अलका उमाळे आणि सौ.रंजना देशमुख या मान्यवरांची देखील प्रमुख उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीतांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संविधानाचे महत्त्व आणि भारताचा गौरव अधोरेखित करणाऱ्या या सादरीकरणाला पालकांचा व शिक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सुनील चव्हाण, मुख्याध्यापक संदीप वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली खालील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी शिक्षक वृंदामध्ये चंदा रोकडे, वर्षा हिवराळे, मीना काटे, वैशाली इंगळे, कल्पना सोळंके, कीर्ती पोके, पुनम लव्हाळे रामेश्वर बुंदेले शिक्षकेतर कर्मचारी चंद्रजीत देशमुख, रणजीत ठाकूर, योगेश लंगोटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने आणि गोड खाऊ वाटपाने करण्यात आला. शाळेच्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.



## जिल्हाधिकारी कार्यालयात विविध सेवांचा शुभारंभ

### ◆ तंत्रज्ञान आधारित सेवांचा समावेश लोकहितकारी

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** वॉररूम, डॅशबोर्ड, व्हॉटसप चॅटबोट अशा अद्ययावत तंत्रज्ञानाधारित सेवांमुळे नागरिकांना वेळीच अचूक माहिती व सेवा मिळून पारदर्शकता येण्यास मदत होईल, असा विश्वास राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे व्यक्त केला.

प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पालकमंत्री कार्यालय व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील सुशोभीकरण कामे, वॉररूम, डॅशबोर्ड व व्हाटसॲप चॅटबोट प्रणाली, बहुउद्देशीय सभागृह, सौर ऊर्जा पॅनल, मिशन एक्सलन्स टार्गेटपीक शैक्षणिक ॲप आदी विविध सेवा-सुविधांचा शुभारंभ झाला. आमदार वसंत खंडेलवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक उपस्थित होते.



पालकमंत्र्यांचे नवे सुसज्ज कार्यालय व सभागृह जनतेसाठी खुले करण्यात आले आहे. जिल्हाधिका-यांच्या संकल्पनेतून डॅशबोर्ड, चॅटबोट, वॉररूम या सेवांचे लोकार्पण झाले. वॉररूमद्वारे आपत्ती व्यवस्थापनादरम्यान यंत्रणा सज्ज करणे, नागरिकांना माहिती देणे व तातडीच्या प्रसंगी आवश्यक कार्यवाही, ग्रामपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत सर्व यंत्रणांना तत्काळ संपर्क साधता येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते झाला. या प्रकल्पामुळे वीजेवरील खर्चात मोठी बचत होणार आहे.

## नरनाळा महोत्सव पोपटखेड येथेच साजरा करावा

### श्याम देशमुख यांच्या मागणीला यश

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोट:** नरनाळा महोत्सव शहानुर, पोपटखेड भागात साजरा केला तर त्या भागातील आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध होईल. आदिवासी लोक संस्कृती जोपासना, वनसंवर्धन, गड किल्ले दर्शन, डोंगराळ दुर्गम भागातील आदिवासींचे वास्तव स्वरूप जनजीवन जवळून बघता येईल ही श्याम देशमुख आणि सहका-यांची मागणी मान्य झाली.

महोत्सव सार्थक तेव्हाच होईल जेव्हा येणाऱ्या पर्यटकांना किल्ले दर्शन व जंगल भ्रमंती व ग्रामीण लोकांना रोजगार ऊपलब्ध करुन देणे हा ऊद्देश डोळ्यासमोर ठेवून महोत्सवाचे आयोजन हे त्याच परिसरात करावे कारण अकोट पासुन शहानुर हे अंतर २२ कि. मी. आहे त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करावा या आयोजनाचे स्थळ हे शहानुर, पोपटखेड परीसरातच करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी साहेब यांचेशी चर्चा करुन आवश्यक त्या ठिकाणीच कार्यक्रम होईल अशा प्रकारचे निवेदन देण्यात आले होते जिल्हाधिकारी साहेब यांना केलेल्या मागणीला यश मिळाले आहे त्यामुळे अकोट तालुक्यातील जनसामान्य व्यक्ती व आदिवासी बहुजन वर्ग आनंदीत झालेला आहे ही मागणी मंजूर झाल्यामुळे डॉ. श्याम देशमुख यांचे कौतुक करण्यात आले आहे.

श्याम देशमुख व मित्रपरिवाराने नरनाळा महोत्सवाचे पोपटखेड येथे लगेच कार्यक्रमाचे काम सुरू केल्याबद्दल नरनाळा वनविभागाचे तोलिया, महसुल विभागातर्फे तहसीलदार सुनील चव्हाण यांचे सुध्दा आभार मानले.

## बिरला कॉलनीमध्ये ७७ व्या प्रजासत्ताक दिनी 'वंदे मातरम'च्या १५० व्या वर्धापन दिनाचा संगम

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभ मुहूर्तावर येथील बिरला कॉलनीमध्ये देशभक्ती आणि सांस्कृतिक अस्मितेचा एक अनोखा संगम पाहायला मिळाला. यंदाचा सोहळा केवळ प्रजासत्ताकाच्या सन्मानासाठीच नव्हता, तर तो राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम'च्या रचनेच्या १५० व्या गौरवशाली वर्षानिमित्तही आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९:३० वाजता मुख्य अतिथींच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. तिरंगा फडकताच संपूर्ण परिसर ठभारत माता की जयठ आणि ठवंदे मातरमठ च्या घोषणांनी दुमदुमून गेला. प्रमुख पाहुणे नगरसेविका शशीकला काळे, नीतू जगताप, प्रशांत जोशी आणि सागर शेगोकार यांनी आपल्या भाषणात देशाची प्रगती आणि अकोलावासियांच्या सामाजिक सहभागाचे कौतुक केले.



त्या म्हणाल्या की, 'आजचा दिवस आपल्या संविधानाची शक्ती आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान करण्याचा दिवस आहे.'

समारंभाचे मुख्य आकर्षण म्हणजे बिरला कॉलनीतील १६ प्रतिभावान मुलांच्या गटाने केलेले 'वंदे मातरम'चे सादरीकरण. यात खालील मुलांचा समावेश होता: कायरा मोर, हितिका मोर, आराध्य पुजारी, अनन्य कोटक, अंशिता मोहता, शौर्य कोटक, अवनेश जोशी, रीत शर्मा, त्रिशा अग्रवाल, मनन लोहाणा, दिव्यम केला, हितिशा अग्रवाल, ओवी पांचोंडे, स्वरा वखारिया, रिद्धिम केला आणि साँचल केला. 'वंदे मातरम'ला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या मुलांनी रागबद्ध पद्धतीने हे गीत सादर केले. त्यांच्या सुमधुर आवाजातील या गीताने उपस्थित प्रत्येक नागरिकाला भावूक केले.

कॉलनीतील रहिवाशांनी हा ऐतिहासिक प्रसंग मोठ्या उत्साहात साजरा केला. स्थानिक आयोजन समितीने सांगितले की, 'वंदे मातरम'ला १५० वर्षे पूर्ण होणे ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे आणि मुलांच्या माध्यमातून हा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हाच या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. ध्वजारोहण आणि सांस्कृतिक कार्यक्रमानंतर मिठाई वाटपाने सोहळ्याची सांगता झाली.

याप्रसंगी बिरला कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक, तरुण आणि मोठ्या संख्येने स्थानिक महिला उपस्थित होत्या.

## मोर्णा नदीत जलकुंभीचा प्रादुर्भाव संदर्भात मनपा प्रशासनाने त्वरित कारवाई करावी

### माजी नगरसेवक गिरीश जोशी यांची मागणी

प्रतिनिधी २७ जानेवारी



**अकोला :** शहरातून वाहणाऱ्या मोर्णा नदीत जलकुंभीची झपाट्याने वाढ होऊ लागली असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांना डास व मच्छरांचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. रात्री झोप न होणे, आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या गंभीर विषयाकडे तात्काळ लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी माजी नगरसेवक व भाजपाचे प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी यांनी महापालिका आयुक्त सुनील लहाने यांच्याकडे केली आहे.मोर्णा नदीवर सुमारे सात किलोमीटर परिसरात जलकुंभी वाढण्यास सुरुवात झाली असून यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या रोगांचा धोका संभवतो. त्यामुळे नदीकाठी असलेल्या नाल्यांची तातडीने साफसफाई करावी तसेच संपूर्ण नदीपात्रातील जलकुंभी काढण्याचे काम त्वरित सुरू करण्यात यावे, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात पुन्हा जलकुंभी वाढू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करत या संदर्भात खासदार व आमदार यांनाही निवेदन देण्यात आल्याची माहिती गिरीश जोशी यांनी दिली आहे.

## नरनाळा महोत्सव, ऑनलाइन सफारीसाठी नोंदणी सुरू

प्रतिनिधी २७ जानेवारी

**अकोला:** मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधी दरम्यान 'नरनाळा महोत्सव-२०२६'चे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाचा उद्देश वने व वन्यजीवांबद्दल जनजागृती प्रचार व प्रसार करणे, वन्यजीवांविषयी आपुलकी निर्माण करणे व स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हा आहे. सदर महोत्सवा दरम्यान निसर्ग निर्वाचन संकुल, शहानुर येथे जंगल सफारी, ट्रकिंग, व्हॅली क्रॉसिंग, रॅपलिंग, झॉर्बिंग रोलर, आणि बोटिंग व झॉर्बिंग वॉटर बॉलचे आयोजन पोपटखेड धरण येथे करण्यात आलेले आहे. सर्व साहसी खेळ राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणेच सुरू ठेवण्यात येतील. जंगल सफारीची नोंदणी https://safaribooking.mahaforest.goved.in/Resort_booking/in&s/ या संकेतस्थळावर करावी.

मॅरेथॉन, सायक्लाथॉन, चित्रकला स्पर्धा, पाककला स्पर्धा, वन्यजीव छायाचित्र स्पर्धा, महोत्सवाची व्हिडीओ रिल्स स्पर्धा, नृत्य स्पर्धा इत्यादी नि:शुल्क असुन विजेत्यांना पारितोषीक देण्यात येईल. या आयोजनाबद्दल माहिती https://narnalafest.in/ या पोर्टलवर प्रकाशीत करण्यात आलेली आहे. या संकेतस्थळावर स्पर्धकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच नरनाळा महोत्सव -२०२६ च्या अनुषंगाने सुचना, मार्गदर्शन, सहाय्य, स्पर्धांचे नोंदणी करीता वन्यजीव अकोट येथे व जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. स्वयंसेवी संस्था व ईतर यांना महोत्सवामध्ये सहकार्य करीता नोंदणी, स्टॉल लावणे करीता नोंदणी तसेच रहीवासा करीता टेंन्ट व्यवस्था पुरविणे बाबत वरील सहायता कक्षात २८/०१/२०२६ रोजी सायंकंळी ५.०० वा. पर्यंत नोंदणी करावी. शहानुर व्यतिरिक्त वनविभागाचे जवळ निवासाकरीता व जंगल सफारी करीता अंबाबरवा अभयारण्य, वसाली गेट येथे वरील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.




नरनाळा महोत्सव -२०२६ च्या अनुषंगाने दिनांक ३० जानेवारी २०२६ ते ०१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सर्व सांस्कृतीक कार्यक्रम हे श्री संत गजानन महाराज विहीरी फाटा जवळ, पोपटखेड रोड ता. अकोट जिल्हा. अकोला येथे आयोजीत करण्यात आले असुन, इतर स्पर्धात्मक कार्यक्रमांची तपशिलवार माहिती https://narnalafest.in/ या पोर्टलवर देण्यात आलेली आहे. पोर्टलबाबत माहिती संदर्भात ई-मेल admin@narnalafest.in भ्र.क्र. ७८४०९३५३७२ या क्रमांकावर संपर्क साधावा. महोत्सवामध्ये जास्तीत जास्त लोकांनी भाग घेण्याचे आवाहन उपवनसंरक्षक अकोट वन्यजीव विभाग तसेच जिल्हाधिकारी अकोला यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# पालिकेच्या ध्वजारोहण कार्यक्रमात प्रोटोकॉलचे उल्लंघन

## विरोधकांचा तीव्र निषेध; फेटे व वयोवृद्धांना उभे ठेवण्यावरून वाद



### प्रशासक राज विसरा : बिपीन चौधरी

■ नगर परिषदेचा कार्यकाळ संपल्यानंतर पालिकेवर तीन ते चार वर्षे प्रशासक राज होता. त्यामुळे पालिकेत 'हम करो सो कायदा' अशी स्थिती निर्माण झाली होती. आता लोकशाही मार्गाने नगराध्यक्ष व नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांनी प्रशासक राज डोक्यात ठेवू नये, प्रशासक राज विसरावा, अशी प्रतिक्रिया नगरसेवक बिपीन चौधरी यांनी दिली.

### 'कायदे रहेंगे तो फायदे में रहेंगे' – डॉ. निरज वाघमारे

■ नगर परिषदेतर्फे आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमात प्रोटोकॉलचे पालन करण्यात आले नाही, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. निरज वाघमारे यांनी केला. अनेक ज्येष्ठ नगरसेवक व महिला नगरसेवकांना उभे ठेवण्यात आले. स्वीकृत सदस्यांना मात्र स्टेजवर बसण्याची व्यवस्था करण्यात आली, तर विरोधी पक्षांचे नेते व गटनेत्यांसाठी कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. २६ जानेवारी रोजी संविधानाची अंमलबजावणी होत असताना त्याच दिवशी कायद्याची पायमल्ली झाली, असा आरोप त्यांनी केला. "कायदे रहेंगे तो फायदे में रहेंगे," अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

### मुख्याधिकाऱ्यांनी आरोप फेटाळले

■ यवतमाळ नगरपालिकेत एक नगराध्यक्ष, ५८ नगरसेवक व ५ स्वीकृत नगरसेवक आहेत. ध्वजारोहण कार्यक्रमासाठी निमंत्रित सदस्यांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती आणि सुमारे १०० खुर्च्या ठेवण्यात आल्या होत्या. मात्र काही ज्येष्ठ नागरिक वेळेपूर्वी आल्याने खुर्च्या कमी पडल्या. त्यानंतर तात्काळ अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली, असे स्पष्टीकरण मुख्याधिकारी शुभम क्षातमवार यांनी दिले. प्रोटोकॉलचे कोणतेही उल्लंघन झाले नसल्याचे सांगत विरोधकांचे आरोप त्यांनी फेटाळून लावले.

प्रतिनिधी २७ जानेवारी

**यवतमाळ :** भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त आज २६ जानेवारी रोजी यवतमाळ नगर परिषदेतर्फे आझाद मैदानात ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मात्र या कार्यक्रमात प्रोटोकॉलचे उल्लंघन झाल्याचा आरोप विरोधी पक्षातील नगरसेवकांनी केला आहे.

नगर परिषदेतर्फे आयोजित या कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेवक, माजी नगरसेवक, स्वातंत्र्य सैनिकांचे कुटुंबीय तसेच मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले होते. मात्र बसण्यासाठी मर्यादित व्यवस्था करण्यात आल्याने अनेक निमंत्रित नगरसेवक, महिला नगरसेवक, स्वातंत्र्य सैनिकांचे कुटुंबीय आणि ज्येष्ठ नागरिकांना उभे राहावे लागले. त्यामुळे उपस्थितांमध्ये नाराजी दिसून आली. कार्यक्रमादरम्यान काही नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी फेटे बांधले होते, तर काही नगरसेवकांना फेटे देण्यात आले नव्हते. या मुद्द्यावरून नगरसेवक आणि मुख्याधिकारी यांच्यात वाद झाला. नगराध्यक्ष या भाजप कार्यालयातून फेटे बांधून आल्या होत्या, तसेच मुख्याधिकारी शुभम क्षातमवार यांनीही फेटा बांधलेला होता. दोघांचे फेटे सारखे असल्याने, "मुख्याधिकारी भाजपाचे आहेत का?" असा सवाल वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. निरज वाघमारे यांनी उपस्थित केला.

यावेळी डॉ. निरज वाघमारे तसेच प्रहार जनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष व नगरसेवक बिपीन चौधरी यांनी मुख्याधिकारी शुभम क्षातमवार यांना जाब विचारला. यामुळे काही काळ कार्यक्रमस्थळी गोंधळाची स्थिती निर्माण झाली.

**चहा-पाणी कार्यक्रमावर बहिष्कार :** या प्रकारामुळे सत्ताधारी पक्षातील घटकपक्ष शिवसेना (शिंदे गट) तसेच वंचित बहुजन आघाडी, प्रहार जनशक्ती पार्टी व काँग्रेसच्या नगरसेवकांनी नगर परिषदेतर्फे आयोजित चहा-पाणी कार्यक्रमावर बहिष्कार टाकला.

# बेंबळा–निम्न पैनगंगेमुळे 'यवतमाळ नंदनवन'– ना. संजय राठोड

## १ मे रोजी एक लाख घरांचा गृहप्रवेश; भारतीय प्रजासत्ताक दिन

प्रतिनिधी २७ जानेवारी

**यवतमाळ :** "बेंबळा आणि निम्न पैनगंगा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे जिल्ह्याची सिंचन क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार असून यवतमाळ जिल्हा भविष्यात नंदनवन बनेल. शेती, रोजगार आणि अर्थव्यवस्थेला या प्रकल्पांचा थेट लाभ होईल," असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त येथील समता मैदानावर आयोजित मुख्य शासकीय समारंभात ते बोलत होते. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सिंचन, कृषी, महिला सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणावर भर देण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'लखपती दीदी' योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १ लाख ९५ हजार महिलांचे आर्थिक सबलीकरण साध्य झाले असून, महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने हे मोठे पाऊल आहे, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले. 'मिशन उभारी' आणि 'योजना पोर्टल'मुळे योजनांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक आणि परिणामकारक झाल्याबद्दल त्यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतुक केले.

ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांनी परेडचे निरीक्षण केले. पोलीस दलाने मानवंदना दिली.

यावेळी उपस्थित नागरिक व विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधक शपथ देण्यात आली. समाजातील अपप्रथा दूर करण्यासाठी जनजागृती आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या सोहळ्यास नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके, जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) डॉ. किशोर मानकर, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वीरमाता व वीरपत्नींचा सन्मान**

कार्यक्रमात देशासाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांच्या स्मृतीप्रित्यर्थ वीरमाता व वीरपत्नींचा सन्मान करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, आदर्श कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



### एक लाख घरांचा गृहप्रवेश

■ प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात घरकुलांची कामे वेगाने सुरू असून, येत्या १ मे रोजी महाराष्ट्र दिनी लाभार्थ्यांचा भव्य गृहप्रवेश सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. "येत्या १ मे, महाराष्ट्र दिनी आपल्या घरी" या विशेष फलकाचे यावेळी अनावरण करण्यात आले. २६ जानेवारी ते १ मे या कालावधीत एक लाख घरे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले असल्याची माहितीही पालकमंत्र्यांनी दिली.

### अत्याधुनिक वाहनांचे लोकार्पण

■ कायदा व सुव्यवस्था आणि प्रशासकीय सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जिल्ह्यासाठी ६२ वाहनांना मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी प्राप्त झालेल्या २४ अत्याधुनिक वाहनांचे लोकार्पण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

# माता रमाई जयंती : देउरवाडी लाडमध्ये बौद्ध धम्म परिषद

प्रतिनिधी २७ जानेवारी

**यवतमाळ :** पंचशिल बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण विकास मंडळ, देउरवाडी लाड यांच्या वतीने माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त ५ व ६ फेब्रुवारी रोजी देउरवाडी लाड ता. दारव्हा येथे भव्य बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन केले जाणार आहे. कार्यक्रम स्थळाला "त्यागमुर्ती माता रमाई परिसर" असे नामकरण करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन भदंत डॉ. नागशेन महाथेरो, अध्यक्ष, महाबोधी बहुउद्देशीय संस्था, वटफळी यांच्या हस्ते होणार असून स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. शिल्पा कटाने उपस्थित राहणार आहेत. निमंत्रकांमध्ये ग्रामपंचायत महागाव कसबा सरपंच किशोर बिहाडे, देउरवाडी लाडचे नारायण सावदे, मध्यवर्ती बॅंक महागाव कसबा व्यवस्थापक उमेश कांबळे, वनपरिक्षेत्र अधिकारी सदानंद मेश्राम, मार्गदर्शक अक्षय खोब्रागडे, प्रा. रामधन हिरे, प्रताप लोणारे, तसेच आयोजक समिती अध्यक्ष राजु रामटेके, उपाध्यक्ष शालीक शेलारे, सचिव गौतम वासनिक, सदस्य भावगंत मेश्राम, प्रकाश वासनिक, माणिक घरडे, महेंद्र शेलारे, विनोद वासनिक सहभागी राहणार आहेत. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहन व बुद्धवंदना, त्यानंतर समता सैनिक दलाची धम्म रॅली काढली जाईल. दुपारी धम्मदेसना व धम्मसंवाद, प्रकाश खरतडे लिखित नाटक "मि भिमाचा दिवाना" (सादरकर्ते: गौतम कांबळे), तसेच धम्म व मानवता, जागतिक शांततेचा आधार या विषयावर व्याख्यान (मार्गदर्शक: प्रा. डॉ. रामधन हिरे, प्रा. डॉ. शांतरक्षित मेश्राम) पार पडणार आहे. रात्री ७ ते १० वाजता रामपाल महाराज धारकर यांचा सांगीतिक कार्यक्रम आयोजित आहे. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता बुद्धवंदना, दुपारी आरोग्य शिबिर व औषध वाटप, लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम, प्रा. प्रशांत मेश्राम यांचे सामाजिक न्याय व सध्याची परिस्थिती, प्रा. प्रकाश तेलगोटे यांचे बाबासाहेबांचे स्वप्न व आजची वास्तविकता, तसेच खुशबु मसिळे लिखित एकपात्री प्रयोग "एका वादळाची संगिणी मी रमाई" सादर केला जाणार आहे. सायंकाळी ७ वाजता एक क्षण गौरवाचा, आणि रात्री ९ वाजता गायक संविधान मनोहरे, गायिका अश्विनि रोशन खोब्रागडे यांचा भिमगीतांचा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जिजाऊ ज्ञान मंदिर स्कूल येथे प्रजासत्ताक दिन व बक्षीस समारंभ

प्रतिनिधी २७ जानेवारी



**उमरखेड :** तालुक्यातील जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, भांबरखेडा येथे दिनांक 26 जानेवारी 2026 रोजी भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी तातू देशमुख (सरचिटणीस, काँग्रेस कमिटी महाराष्ट्र प्रदेश) होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीकांत महाजन, निलेश शेंबडे (ठाणेदार, पोफाळी पोलीस स्टेशन), पोलीस उपनिरीक्षक शिंदे, आठवले (बीट जमादार), चित्तांगराव कदम (माजी जि. प. सदस्य), डॉ. अजित चंदेल (मंडळ अध्यक्ष, भाजपा पुसद), डॉ. मनवर (सामाजिक कार्यकर्ते, शेंबाळपिंपरी), अनिल बरडे (केंद्रप्रमुख, मुळावा) उपस्थित होते. शाळेचे संस्थापक अध्यक्ष दीपक धर्माधिकारी, सेक्रेटरी कुणाल वानखेडे, मुख्याध्यापक तिरुपती मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर ध्वजपूजन करून श्रीकांत महाजन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सामूहिक राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत झाले. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी कवायतीद्वारे मानवंदना दिली. तंबाखूमुक्त शपथ, कॉपीमुक्त शपथ व साक्षरता अभियान शपथ घेण्यात आली. उपमुख्याध्यापिका रामेश्वरी मुंडे यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास शिक्षक मनोज चव्हाण, ज्ञानेश्वर शिंदे, सुषमा हिंगाडे, रेखा पावडे, सुषमा कदम, रोशनी कदम, मुक्ता कदम, सेवक राजू रणखांब, वाहन चालक व मालक बंडू कदम, पवन मोरे, सलीम भाई, कन्हैया ठाकूर तसेच ग्रामपंचायत सदस्य संभाजी देशमुख, रमेश देशमुख, अमृत देशमुख, सुरेश राणे, संतोष देशमुख, विलास मासोळकर, पोलीस पाटील मारोतराव देशमुख, अंगणवाडी सेविका ज्योती देशमुख, आशाताई देशमुख, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संचालन तिरुपती मुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन दीपक धर्माधिकारी यांनी केले.

# माथार्जुन येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण

प्रतिनिधी २७ जानेवारी

**झरी जामणी :** प्रजासत्ताक दिनानिमित्त ग्रामपंचायत माथार्जुन व सर्व समिती यांच्या वतीने गावातील विविध ठिकाणी ध्वजारोहणाचे कार्यक्रम उत्साहात पार पडले. सकाळी ग्रामपंचायत कार्यालय, माथार्जुन येथे सरपंच यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च प्राथमिक जिल्हा परिषद शाळा येथे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, बालाजी कनिष्ठ महाविद्यालय येथे संस्थापक,शासकीय माध्यमिक आश्रम शाळा येथे मुख्याध्यापक यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत देशभक्तीपर वातावरणात कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास ग्रामस्थ, माजी पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर सकाळी पारंपरिक बैल बाजाराचे उद्घाटन माननीय सरपंच रवींद्र बापूराव कायतवार, पोलिस पाटील प्रकाश गेडाम, श्री. बाबूलाल किनाके तसेच ग्रामपंचायत सदस्य व सर्व समिती यांच्या शुभहस्ते करण्यात आले. बैल बाजारामुळे गावात उत्साही वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, एक विशेष उपक्रम म्हणून माथार्जुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या निर्मल सेवा अभ्यासिका या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन माननीय सरपंच रवींद्र कायतवार व पत्रकार योगेश मडावी यांच्या हस्ते करण्यात आले. ही अभ्यासिका प्रा. उमेश कुंडमेथे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आली आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, या उद्देशाने ही अभ्यासिका सुरू करण्यात आली असून ही सुविधा पूर्णतः निशुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहे. निर्मल सेवा अभ्यासिका ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

# जे.एस.पी.एम. उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये आनंदमेळावा



प्रतिनिधी २७ जानेवारी

**फुलसावंगी :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जे.एस. पी.एम. उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे वार्षिक आनंदमेळा साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणे आणि शालेय जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

आनंद मेळ्याचे उद्घाटन सहाय्यक शिक्षक अब्दुल सलीम व बाबर लाला यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक अब्दुल समद यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी सहाय्यक शिक्षक अब्दुल सलीम, मोहम्मद मुसद्दीक, सय्यद वसीम, शाहीद खान, सय्यद मुजाहिद, आकिब रिझवी, नजीर खान, सुमय्या मॅडम, शेख शबीना, शेख फातेमा, मोहम्मद इरफान, शेख जावेद, रफिक गौरी, रफिक नवाब, शेख मुजफ्फर आदी उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषद उर्दू शाळेचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास बाबर लाला, शेख तसलीम, नदीम भाई, सोहेल भाई, रियाज खान, समीर अहमद, अनसार खान यांच्यासह पालकांचीही उपस्थिती लाभली. आनंद मेळ्यात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार करून आणलेल्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल हे विशेष आकर्षण ठरले. यावेळी ४० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या आनंद मेळ्याचा शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला.

# नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार

प्रतिनिधी २७ जानेवारी



**उमरखेड :** पतंजली योग समिती व अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने नवनिर्वाचित नगराध्यक्षा व सर्व नगरसेवकांचा भव्य सत्कार सोहळा स्थानिक विरंगुळा केंद्रात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतंजली योग समिती (पूर्व विभाग) प्रांताध्यक्ष दिनेशजी राठोड होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आ. किसनराव वानखेडे, जनशक्ती आघाडी प्रमुख ॲड. संतोष जैन, जिल्हा सहकारी भारत स्वाभिमानचे अध्यक्ष विलासराव देवसरकर, नवनिर्वाचित नगराध्यक्षा तेजश्री जैन, तालुका पतंजली योग समितीचे यशवंत गिरी, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. स्वागतगीतानंतर प्रा. प्रकाश देशमुख यांनी प्रास्ताविकातून ग्राहक पंचायतचे कार्य, ग्राहक हक्क, तक्रार निवारण प्रक्रिया तसेच ग्राहक संरक्षण कायदा १९८६ व सुधारित कायदा २०२० मधील तरतुदींची माहिती दिली. विलासराव देवसरकर यांनी योगाचे महत्त्व व उमरखेड शहरातील योगकेंद्रांची माहिती देत नियमित योगसाधनेचे आवाहन केले. यानंतर नवनिर्वाचित नगराध्यक्षा तेजश्री जैन यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सर्व नवनिर्वाचित नगरसेवक व स्वीकृत सदस्य ॲड. बाळासाहेब नाईक, गोपाल शेठ अग्रवाल व प्रा. विजय गुजरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिक्षक डी.एम. जाधव, प्रा. व्ही.एन. कदम व ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष दिगांबर तंवर यांनाही गौरविण्यात आले. सत्काराला उत्तर देताना नगराध्यक्षा तेजश्री जैन यांनी जनतेचे आभार मानून शहराच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. आमदार किसनराव वानखेडे यांनी पतंजली योग समिती व ग्राहक पंचायतच्या कार्याचे कौतुक करून शहरातील प्रत्येक प्रभागात योगकेंद्रे उभारण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

ॲड. संतोष जैन यांनी योग ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात दिनेशजी राठोड यांनी योगाच्या माध्यमातून आरोग्यसंपन्न समाजनिर्मितीचा संदेश दिला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. विनय चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अमोल कवाणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष दत्ता गंगासागर, ॲड. रायवार, सचिव रतीराव बोरगडे, संचालक किशोर भंडारी, शेखर बंडेवार, भारत कुलकर्णी व सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. संजय मुटकुळे यांच्या रिधम म्युझिक अकॅडमीच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आजचा विद्यार्थी देशाचा जबाबदार नागरिक : प्रा. मेश्राम

प्रतिनिधी २७ जानेवारी




**दारव्हा :** आजचा विद्यार्थी हा देशाचा जबाबदार व कर्तव्यदक्ष नागरिक असून, त्याने जबाबदारीने शिक्षण घ्यावे तसेच समाजात निर्माण झालेल्या कुप्रथा व अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्नशील राहावे, असे प्रतिपादन प्रा. प्रशांत मेश्राम यांनी केले.

जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या दत्तक ग्राम दहेली येथे आयोजित बौद्धिक सत्रात ते मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. रूपाली कणसे होत्या, तर विचारपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रामधन हिरे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. प्रशांत मेश्राम यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक जबाबदारीचे भान ठेवावे, विवेकवादी दृष्टीकोन अंगीकारावा आणि समाजातील अंधश्रद्धा, कुप्रथा दूर करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. रूपाली कणसे यांनी विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून शिस्तबद्ध व आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारावी, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कु. वैष्णवी नाटकर यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रामधन हिरे यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन कु. वेदिका ठवकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश सरतापे, सोमराज लोहकरे, गट प्रतिनिधी कु. पायल पवार, उत्कर्ष जाधव, राहुल आडे, प्रथमेश आडे, विशाल उमरे, जानवी गुल्हाने, शारदा भगत, पायल राठोड, रिद्धी आवारे, कोमल लोहकरे, प्रीती राठोड, वैष्णवी राठोड आदी स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले.

# वृद्धावर लाकडी काठीने हल्ला

प्रतिनिधी २७ जानेवारी

**मारेगाव :** तालुक्यातील ग्राम चोपन येथे घराच्या बांधकामासाठी ठेवलेल्या साहित्यावरून झालेल्या वादातून एका वृद्धावर लाकडी काठीने हल्ला झाल्याची घटना घडली. या प्रकरणी मारेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेत करनुजी उरकुरा चाहारे (वय 73, रा. चोपन) हे जखमी झाले असून, त्यांच्या तक्रारीवरून कारवाई करण्यात आली. आरोपीचे नाव नरेश विठु गुरनुले (वय 62, रा. चोपन) असे आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, 24 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी आरोपीने घराच्या बांधकाम साहित्यावरून वाद घालत शिवीगाळ केली व वेळवाच्या लाकडी काठीने डोक्यावर मारहाण करून जखमी केले. जिवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. रात्री 9.34 वाजता तक्रार नोंदविण्यात आली. घटनेमुळे गावात संताप व्यक्त होत असून कठोर कारवाईची मागणी होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com









# सर्वांच्या सहकार्यातून जिल्ह्याचा विकास करुया - पालकमंत्री

## पोलीस कवायत मैदान येथे प्रजासत्ताक दिनाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

जिल्ह्याचा प्रगतीचा प्रवास आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे शक्य होईल. आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केल्यास वाशिम जिल्हा महाराष्ट्रातील एक आदर्श जिल्हा बनू शकतो. आपल्या संविधानाच्या आदर्शांवर चालत, आपण विकासाची नवी शिखरे गाठूया. आपल्या सर्वांच्या सहकार्यातून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करुया असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त वाशिम येथील पोलीस कवायत मैदान येथे पालकमंत्री श्री. भरणे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना संबोधित करतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर ,जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, अपर पोलीस अधिक्षक लता फड, उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्यासह इतर मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती. भरणे म्हणाले, वाशिम जिल्ह्याने शेती क्षेत्रात



उल्लेखनीय प्रगती केली आहे. जिल्ह्याच्या विकासाबाबत शेती, रोजगार, पाणी व्यवस्थापन, रस्ते, घरकुल योजना, महिला सक्षमीकरण, युवकांचे कौशल्य विकास आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यावर विशेष भर देण्यात येत आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमुळे सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत आहेत, ही बाब निश्चितच समाधानकारक आहे. पालकमंत्री श्री. भरणे यांच्या हस्ते वीर पत्नी पार्वतीबाई दगडू लहाने, वीर पत्नी वैशाली गोरे, वीरपत्नी मीराबाई नागुलकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवी संस्थांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार, गुणगौरव व पुरस्कार वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत व नायब तहसीलदार अर्चना घोळवे यांनी केले. कार्यक्रमाला माजी सैनिक, वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी, विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, पत्रकार बांधव, नागरिक व विविध शाळेचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्यानंतर, विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाच्या अखेरीस, उपस्थित मान्यवरांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली.दरम्यान जिल्हा वार्षिक योजनेतून पोलिस विभागाने खरेदी केलेल्या २० बोलेरो वाहनांचे अनावरण पालकमंत्री श्री. भरणे यांनी केले.विविध कार्यालयाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## थोडक्यात

### मंगरूळपीर येथील बस आगारात चालक दिन साजरा



•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

मंगरूळपीर येथील बस आगारात ता २४ रोजी सकाळी अकरा वाजता उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १६ चालकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक संदीप पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून सहायक वाहतूक अधीक्षक शैलेश राठोड वाहतूक निरीक्षक दीपक विटकरे, कार्यशाळा अधीक्षक नितीन तायडे, लेखाकार निकिता पवार, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी या कार्यक्रमात कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी याशिवाय डिझेल बचत करणारे चालक इंगोले, धर्मामाळी, टोचर, खान, काळेल, गव्हाणे ,पाकधने, घोरसडे ,राठोड, मुळे ,खान, चौधरी, पारधी, पंडित, नंदापुरे, भगत या सत्कारमूर्ती चालकांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे संचालन लक्ष्मण डहाके तर आभार राजू आगे यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता बस आगारातील सर्व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला होता.

### महात्मा फुले उद्यानात सुविधांचा अभाव

•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

मंगरूळपीर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर लगत असलेल्या महात्मा ज्योतीराव फुले उद्यान हे शहरातील एकमेव उद्यान आहे. दररोज सकाळी आणि सायंकाळी अनेक ज्येष्ठ नागरिक, तरुण आणि लहान मुले फिरण्यासाठी व खेळण्यासाठी येत असतात. तेथे पायी फिरण्यासाठी सुंदर ट्रॅक आहे. नगर परिषदेने आणि नागरिकांनी पुढाकार घेऊन अनेक झाडे लावली आहेत.

## चोरद येथील दलीत वस्तीचा निधी, मिळणार कधी !

•अनंत घुगे @ शेलुबाजार•

नजीकच्या चोरद व जानूना गट ग्रामपंचायतला मिळालेला दलीत वस्तीचा निधी इतरत्र वापरण्यात आला आहे. सदर धक्कादायक बाब समोर आल्याने ग्रामस्थांकडून रोष व्यक्त केला जात आहे. निधीच्या या हेराफेरीची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

गट ग्रामपंचायत चोरद व जनुना खुर्द अंतर्गत दलित वस्तीचा रस्ता दुसऱ्या जागेवर केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते बलवंत घुगे यांनी केली. रस्ता चे काम शेवटच्या टप्प्यात होते मात्र इंजिनिअर यांनी पाहनी न करता ते पूर्ण केले. जागेवर रस्ता



बांधण्यासाठी परवानगी दिल्याने संबंधित विभागाचे अधिकारी अडचणीत येण्याची शक्यता आहे. दलित वस्ती निधी लाटण्यासाठी गावात खोट्या दलित वस्ती, चुकीचे नकाशे तयार करून शासनासह जि. प.ची दिशाभूल केल्याचे तक्रार कर्त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या तक्रारीनुसार ग्रामपंचायतीने दलित वस्तीसाठी चुकीच्या मार्गाने निधी पंचायत समितीमधून वर्ग करण्याची तयारी केली आहे, ही बाब तक्रारकर्ते, सामाजिक कार्यकर्ते बलवंत रामराव घुगे यांच्या लक्षात आली. त्यांनी १८ डिसेंबर २०२६ रोजी पंचायत समितीचे गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून याबाबत चौकशी करण्यासाठी निवेदन दिले. जोपर्यंत

### मिळालेल्या निधीत हेराफेरी, चौकशीची मागणी

चौकशी होत नाही तोपर्यंत दलित विकास निधी अन्वी ग्रामपंचायतीला न देण्याची मागणी केली.तरीही कामासाठी निधी दिला. यातही दुसऱ्या जागेवर रस्ता काम सुरू आहे. त्यामुळे हे काम थांबववे, कामाची चौकशी करवी, अन्यथा उपोषणाला बसण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला. याबाबत जिल्हाप्रशासनाकडे तक्रार केली. त्यामुळे मुख्यकार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, गटविकास अधिकारी रसारिका कार्ले यांच्या चौकशीकडे, निर्णयाकडे ग्रामस्थ यांचें लक्ष लागले आहे.

## पिंप्री अवगण येथे प्रजासत्ताक दिन

•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

येथील परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व.मधुकरराव ल. सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते ध्वजस्तंभाच्या पूजनानंतर प्राचार्य सुनिल सपकाळ यांनी ध्वजारोहण केले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. सुनिलजी सपकाळ उपस्थित होते.



यावेळी विद्यालयातील विद्यार्थी जे विविध शासकीय सेवेत लागलेले गोपाल अवगण, महेंद्र ठाकरे, श्रीहरी अवगण, कुणाल शंकर भोंगळ आदींचा यावेळेस सत्कार करून गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रितम गौपाल सर यांनी केले.तसेच कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमातून शिस्त, उत्साह व देशप्रेमाचे सुंदर दर्शन घडले.

## समृध्दी महामार्गावर... ट्रकचा अपघात एक गंभीर जखमी

•सिटी न्युज ब्युरो @ कारंजा•

दि.२४ रात्री दहाच्या सुमारास ट्रक क्रमांक डब्ल्यू बी ९३ बी. ३५३४ संभाजीनगरहून वेस्ट बंगाल कोलकाता येथे जात असताना चैनल क्रमांक १८३ वर चालकाला झोपेची डुलकी आल्यामुळे तो डिवाइडरवर आदळून चालक गंभीर जखमी झाला चालकाचे नाव सायन मंडल रा.वेस्ट बंगाल कोलकाता अपघाताची माहिती मिळताच १०८ समृद्धी महामार्ग पायलट आतिश चव्हाण व डॉक्टर भास्कर राठोड हे तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन जखमी असलेल्या चालकाला कारंजा उपजिल्हा रुग्णालयाचे आणले तेथील वैद्यकीय अधिकारी सागर मस्के यांनी त्यावर प्रथम उपचार करून पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर केले.



त्यावेळी मदतीसाठी गुरु मंदिर चे रुग्णवाहिकेचे रुग्नेसेवक रमेश देशमुख समृद्धीचे रुग्णवाहिकेचे अजय घोडेस्वार, मुंगसाजी महाराज रुग्णवाहिकेचे शिवम खोड, मेस्को सिक्युरिटी गार्ड वैभव घुले, धीरज गुल्हाने, हायवे पोलीस समृद्धी महामार्ग व अग्निशामक दल समृद्धी महामार्ग घटनास्थळी हे प्रामुख्याने मदतीसाठी उपस्थित होते.

## छत्रपती चषक डोणगावच्या डीसीए संघाने पटकावला !

•सिटी न्युज ब्युरो @ रिसोड•

तालुक्यातील खडकी सदार येथे संजूभाऊ सदार मित्रमंडळाच्या वतीने दरवर्षी छत्रपती चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. आयोजनातील सुसूत्रता आणि दूरवरून येणाऱ्या संघाची चोख व्यवस्था व पंचकमेटीचा पारदर्शक निर्णय आदी स्तुत्य कारणाने छत्रपती चषक स्पर्धा तालुक्यातच नव्हे; तर पश्चिम विदर्भात लक्षवेधी ठरत आहे. परिणामी शेजारच्या अनेक जिल्ह्यातील संघ या स्पर्धेत भाग घेत असतात. रिसोड - मालेगावचे आ. अमित झनक यांच्याकडून प्रथम क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले असून या वर्षीचा छत्रपती चषक डोमगावच्या डीसीए संघाने पटकावला असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

या स्पर्धेचा अंतिम सामना २४ जानेवारी रोज शनिवारला संपन्न झाला.

### खडकी सदार येथील छत्रपती चषक स्पर्धा ठरली लक्षवेधी



स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक माननीय आमदार श्री अमित भाऊ झनक यांच्याकडून देण्यात आले. प्रथम बक्षीस डीसीए डोणगाव या संघाने पटकाविले. द्वितीय क्रमांकाचे बक्षीस डॉक्टर चंद्रशेखर देशमुख यांच्याकडून देण्यात आले. द्वितीय बक्षीस एलसीसी लोणार संघ यांनी मिळविले. तृतीय क्रमांकाचे बक्षीस माननीय भगवानराव चोपडे यांच्याकडून देण्यात आले. हे बक्षीस अमडापूरया संघाने मिळवले. चतुर्थी क्रमांकाचे बक्षीस माननीय श्री भगवानराव गाडे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड यांच्याकडून देण्यात आले.

सदर बक्षीस अवलिया बाबा खंडाळा संघाने मिळवले.पाचवे बक्षीस माननीय अर्जुन पाटील खरात यांच्याकडून देण्यात आले. सदर बक्षीस युवा मंच डोंगर खंडाळा यांनी मिळवले. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापक पंढरीनाथजी चोपडे हे होते. प्रमुख उपस्थिती मध्ये ओमभाऊ पंडितराव झनक, रामेश्वर देवकर, भगवानरावजी चोपडे, भगवानराव गाडे, अर्जुन पाटील खरात, राजूभाऊ खाबलकर, कार्तिक भाऊ कोरडे, सखारामजी आंबेकर, अनिल लहाने, स्वप्निल भाऊ धांडे, धनंजय काष्टे, प्रताप साबळे, डॉ.मंगेशजी बकाल विष्णू पाटील जाधव सरपंच गणेशपूर, संतोष बिल्लारी, आप्पाराव शिंदे, सोहेल भाई, उत्तमराव झगडे, साजिद भाई, राजूभाऊ कोकाटे, रियाज भाई नगर परिषद सदस्य, समीर भाई नगर परिषद सदस्य, मयूर भाऊ तायडे, गाडे , शिंदे , गव्हाणे , सुलताने , जाधव , फुपाटे , बकाल , खडसे , मंगेश कोरडे, सचिन काकडे, मंगेश ढोणे, आरु साहेब, रवी दांदडे नगरसेवक, अरुण पाटील खरात, शिवाजी कालवे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फुफाटे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दीपक सर यांनी केली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता संजूभाऊ सदार मित्रपरिवार यांनी अथक परिश्रम घेतले.

## घनकचरा विलिनीकरण प्रक्रिया 'फ्रि ऑफ कॉस्ट'...

# आता शहर स्वच्छ होणार 'फास्ट'!

***न.प. मुख्यधिकाऱ्यांची संकल्पना * राम डोरले यांचा पुढाकार *पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते उद्घाटन**

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

शहर स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत वाशिम येथे घनकचरा विलिनीकरण प्रक्रिया केंद्राचे उद्घाटन आज दि.(२६)रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. 'फ्री ऑफ कॉस्ट' तत्वावर चालविला जाणारा हा विलगीकरणाचा प्रथम प्रकल्प आहे. हा प्रकल्प न.प.मुख्यधिकारी निलेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आला आहे. यासाठी राम डोरले पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. आता या प्रकल्पातून शहर स्वच्छ होणार आहे.

यावेळी नगरपालिका मुख्याधिकारी निलेश गायकवाड, नगरपालिका प्रशासनातील अधिकारी, लोकप्रतिनिधी,




स्वच्छता कर्मचारी व नागरिक मोठ्या उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री ना. भरणे यांनी केंद्राची पाहणी करून कार्यपद्धतीची राम डोरले यांच्याकडून माहिती जाणून घेतली.पालकमंत्री म्हणाले की, घनकचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण, प्रक्रिया व पुनर्वापर केल्यास पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम कमी करता येतो. हे केंद्र म्हणजे स्वच्छ भारत अभियानाला बळकटी देणारे महत्त्वाचे पाऊल असून, शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने होणार आहे. या केंद्रामार्फत ओला व सुका कचरा वेगळा करून त्यावर प्रक्रिया करण्यात येणार असून सेंद्रिय कचऱ्यापासून खतनिर्मिती, तर पुनर्वापरयोग्य कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. जिजा ॲग्रिकल्चर प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडचे संचालक राम डोरले यांनी केंद्राच्या उभारणीबाबत माहिती देताना सांगितले की, स्वच्छता व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून भविष्यात नागरिकांच्या सहकार्याने हे केंद्र आदर्श ठरेल. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नागरिकांनीही स्वच्छता राखण्याची व कचरा वेगळा करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले. घनकचरा विलगीकरण केंद्रातील काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांशी पालकमंत्र्यांनी यावेळी संवाद साधला.

### वाशीम शहराची स्वच्छतेकडे वाटचाल

१५ वर्षापासून वाशिम शहरातील कचऱ्याचे कधीच विलगीकरण करण्यात येत नव्हते, कोट्यवधी रूपये खर्च करूनही प्रक्रिया न करता कचरा खाल्या जात असल्याचे वृत्त मालिका सिटी न्युज सुपरफास्टने ६७ वृत्तातून चालविली. मात्र आता न.प. मुख्यधिकारी निलेश गायकवाड यांच्या संकल्पनेतून सामाजिक कार्यकर्ते राम डोरले यांच्या पुढाकारातून विनाखर्चा कचऱ्यावर प्रक्रिया होत आहे. त्यामुळे शासनाचे व नगर पालिकेचे दरवर्षीचे २ ते ३ कोटी रूपये वाचणार आहेत. यापुर्वी डम्पिंग गाऊंडवरील कचरा प्रक्रिया न करता जाळून खाल्या जात होता. आता मोफत कचऱ्यावर प्रक्रिया होत असल्याने शहर स्वच्छ होवून परिसरातील नागरिकांच्याही आरोग्यात सुधार होणार आहे.

## सिने अभिनेते भारत गणेशपुरे येणार वऱ्हाडी शैलीत संवाद साधणार

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यक्रमाचे पारवा येथे आयोजन

•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रमाकरिता सुप्रसिद्ध अभिनेते व हास्य सम्राट भारत गणेशपुरे ता २७ रोजी तालुक्यातील पारवा या गावी येणार असून या कार्यक्रमाला समस्त गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन येथील सरपंच गोपाल लुंगे व उपसरपंच व सदस्य यांनी केले आहे.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान विशेष कार्यक्रमात जिल्हाधिकारी योगेश कुंभेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, व गटविकास अधिकारी पूनम राणे आदी मान्यवर उपस्थित राहणार



आहे.

तसेच या अभियानाची मोठ्या प्रमाणात जनजागृती व्हावी व गावाच्या प्रगतीत सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी गावाकऱ्यांशी खास वऱ्हाडी शैलीत गावकऱ्याशी व येणाऱ्या नागरिकाशी सुसंवाद साधण्यासाठी सुप्रसिद्ध सिने अभिनेते हास्यसम्राट भारत गणेशपुरे येत आहे या कार्यक्रमाला समस्त जनतेने उपस्थित राहावे.


































हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK